**नियमीत दिवाणी दावा नं.५१४/२०१९ नि. २९ वरील आदेश**

**CNR No.MHBI14001319-2019**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने यांनी दाव्यातील दावा मिळकत म्हणजेच मौजे सव्र्हे नंबर १५/अ/२१ ची संपुर्ण तुकडयाची मोजणी करुन वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्या क्षेत्राची मोजणी करुन ताबा वहिवाट प्रमाणे नकाशासह रिपोर्ट मागविण्यात यावा म्हणुन दाखल केलेला आहे. सदरील अर्जावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन हरकत दिलेली आहे. प्रस्तुतचा अर्ज वाचला. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांचे वकीलांमार्फत युक्तीवाद ऐकण्यात आला.

२. प्रस्तुतच्या अर्जामध्ये प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, सदरची वादग्रस्त मिळकत ही प्रतिवादी क्र २ हिने वादीच्या वडीलांकडुन खरेदीखताने घेतलेली आहे. त्यानंतर सदर मिळकतीमधील १८ आर. क्षेत्र हे पुर्व बाजुचे वादी यांनी प्रतिवादी क्र २ यांच्याकडुन खरेदी केलेले आहे. सदर क्षेत्राची मोजणी कधीही न झाल्यामुळे वादीने सदरच्या गोष्टीचा फायदा घेऊन सदरचा दावा दाखल केलेला आहे. सव्र्हे नंबर १५/अ/२१ चा नकाशा जर पाहिला असता त्यामध्ये २१ पोटहिस्से पडलेले दाखवलेले आहेत. परंतु ७/१२ ची फोड झालेली नाही. त्यामुळे सव्र्हे नंबर १५/अ/२१ चा ७/१२ हा एकच आहे. वादी जर सदर कोर्ट कमिशनरची फीस भरण्यास तयार नसेल तर प्रतिवादी क्र २ ही सदर प्रकरणात कोर्ट कमिशनरची फीस भरण्यास तयार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. याउलट, वादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी ३१ वर दाखल केले आहे. त्याच्या कथनानुसार सव्र्हे नंबर १५/अ/२१ मधील केवळ १८ आर. क्षेत्र आहे. बाकीचे इतर क्षेत्र २४ एक्कर २४ गुंठे असे आहे. तसेच सव्र्हे नंबर मध्ये खातेदार अनेक असुन सदरचे खातेदार हे दाव्यामध्ये सामील नाहीत. तसेच त्यांच्या क्षेत्राशी वादी व प्रतिवादी यांचा काहीही संबंध नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेली मागणी सव्र्हे नंबर १५/अ/२१ ची संपुर्ण तुकडयाची मोजणी करुन ताबा वहिवाट प्रमाणे नकाशासह रिपोर्ट मागविण्यात यावा ही अवास्तव, बेकायदेशीर व चुकीची अशी आहे. सदरची मागणी ही मंजुर झाल्यास इतर खातेदारासोबत प्रतिवादी यांचे वादविवाद सुरु होतील.

त्यामुळे सदरचा अर्ज हा कायदेशीर नसल्यामुळे नामंजुर करण्यात यावा.

४. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकीद हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. तसेच सदर प्रकरणाची अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र २ हिच्या कडुन वादी याने सदरची वादग्रस्त मिळकत विकत घेतलेली आहे. तसेच सदर कोर्ट कमिशनरची नियुक्ती ही पुरावा गोळा करण्यासाठी सदर प्रकरणात करता येणार नाही. तसेच वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये अदयापपर्यंत कसल्याही प्रकारचे वाटप झालेले दिसुन येत नाही. तसेच प्रतिवादी यांनी महाराष्ट्र जमीन महसुल कायदयाप्रमाणची पोटहिस्सयाच्या तुकडयांची मोजणी करुन घेऊ शकतात. त्यामुळे सदरचा अर्ज पुरावा गोळा करण्यासाठी कोर्ट कमिशनरची नियुक्ती करणेबाबत कायदेशीर नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा नामंजुर करण्यास पात्र आहे. त्यामुळे खालील आदेश पारीत करण्यात आला.

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात आला.

SNEHA VENKATRAO UTKAR

Digitally signed by SNEHA VENKATRAO UTKAR
Date: 2024.07.23 11:47:09 +0530

स्थळ– आष्टी . ( एस.व्ही.उतकर )

दिनांक १६–०७–२०२४ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आष्टी.